<u>अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष</u>

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

<u>सरतपास अर्जदार तर्फे विधिज्ञ श्री.एस.के.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>

२०. मला नि.क्र. ४१/१ वर दाखल असलेले दि. १८/०७/२०१९ रोजीचे मी दाखल केलेली एन.सी. ची प्रत दाखविण्यात आली. सदर एन.सी. मी दिलेल्या तक्रारीवरुन दाखल करण्यात आली होती. एन.सी.मधील कॉलम नं. ५ मधील नमूद मजकूर मी सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

२१. मला आता नि.क्र. ४१/२ वर दाखल असलेला स.नं. २९८/१/४ब/२ या मिळकतीचा ७/१२ ची सहीसुद नक्कल दाखविण्यात आली. सदर दस्त हा सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **<u>नि.क्र. ८१</u>** देण्यात येते.

२२. मला आता नि.क्र. ४१/३ वर दाखल असलेले मालवण नगरपरिषद घर नं. २०९६अ चे नमूना नं. ४३ ची सहीसुद नक्कल दाखविण्यात आली. सदर दस्त हा सार्वजनिक दस्त असल्याने त्यास नि.क्र. ८२ देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

सामनेवालातर्फे विधिज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.

दि. ०५/०६/२०२६